International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# समकालीन भारतीय समाजासमोरील समस्या व आव्हाने

**डॉ. शिंदे भागवत आसाराम**

*रयत शिक्षण संस्थेचे,*

*स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर*

***Corresponding Author - डॉ. शिंदे भागवत आसाराम***

**DOI - 10.5281/zenodo.10937629**

**प्रास्ताविक :**

भारतीय समाज आज वेगवेगळ्या समस्या व आव्हानांना सामोरे जाताना प्रकर्षाने दिसून येतो. समकालीनतेच्या संदर्भात एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून ते आज पर्यंत आपल्याला भारतीय समाजातील वैयक्तिक व सामाजिक स्तरावरील वेगवेगळ्या समस्या व आव्हानांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. या सर्व समस्या व आव्हाने दिवसेंदिवस अधिक जटील स्वरूप धारण करताना दिसत आहेत. त्यांच्या निराकरणाचे ठोस असे प्रयत्न शासकीय व सामाजिक स्तरावरून होताना दिसत नाहीत. या दृष्टीने भविष्यात या सर्व समस्या व आव्हाने भारतापुढे गंभीर असे प्रश्न निर्माण करू शकतात. या सर्व पार्श्वभूमीवर प्रस्तुत शोधनिबंधातून समकालीन भारतीय समाजातील कौटुंबिक व सामाजिक स्तरावरील समस्या व आव्हानांचा विचार मांडला आहे.

**कौटुंबिक स्तरावरील समस्या व आव्हाने :**

भारतीय कुटुंब व्यवस्था ही जगात आदर्श मानली जाते. परंतु आज या कुटुंब व्यवस्थेला दिवसेंदिवस तडे जाताना दिसत आहेत. त्यातून कौटुंबिक स्तरावर आज भारतीय माणूस विविध प्रकारच्या समस्या, आव्हानांना समोर जात आहे.

**एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास:**

पूर्वी भारतामध्ये बहुतेक समाजामध्ये एकत्र कुटुंब पद्धती प्रचलित होती. ही सर्व मंडळी एका कुटुंबामध्ये गुण्यागोविंदाने, सुखासमाधानाने नांदत होती. आहे त्या परिस्थितीत समाधान मानून जगत होती. परंतु एकेविसाव्या शतकामध्ये प्रामुख्याने आपल्याला ही एकत्र कुटुंब पद्धती दिवसेंदिवस नामशेष होताना दिसत आहे. आज विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण कैक पटीने वाढल्याने एकत्र कुटुंब शोधणे अवघडच झाले आहे. या एकत्र कुटुंब पद्धतीच्या ऱ्हासातून पुढे भारतीय माणसाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागताना दिसत आहे.

**तंत्रज्ञानाचा वाढता विळखा :**

एकत्र कुटुंब पद्धतीच्या ऱ्हासातून विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण वाढले. शिवाय एकविसावे शतक हे तंत्रज्ञानाचे शतक मानले जाते. टी.व्ही., मोबाईल, इंटरनेट अशी वेगवेगळी तंत्रज्ञानाधारित साधने आज माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहेत. स्मार्टफोनवरील व्हाट्सअप, इंस्टाग्राम, facebook, twitter ही सर्व समूह संपर्क माध्यमे सर्वसाधारण माणसेही सर्रास वापरताना दिसत आहेत. त्यातून त्यांच्या वैयक्तिक, कौटुंबिक जीवनातील नातेसंबंध, एकमेकाविषयीचा जिव्हाळा, प्रेम दिवसेंदिवस कमी होत आहे. तास न तास तंत्रज्ञानाधारित साधनांच्या आहारी गेलेल्या माणसाला आपल्या

आरोग्याकडे लक्ष देणे अवघड झाले आहे. अशातून अशा माणसांमध्ये एक प्रकारचे यांत्रिकपण दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत.

**कौटुंबिक कलहात वाढ:**

एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास, तंत्रज्ञानाचा वाढता विळखा, प्रत्येकामध्ये वाढलेली टोकाची स्वार्थी, अहंकारी वृत्ती, घरामध्ये ज्येष्ठ माणसांचा अभाव, समंजसपणाची कोणीही भूमिका न घेणे यातून कौटुंबिक कलहात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. हा कौटुंबिक कलह केवळ घरातील इतर सदस्यापुरता न राहता पती-पत्नीमध्ये ही प्रचंड प्रमाणामध्ये दुरावा, कलह निर्माण होत आहे. त्यामुळे भारतीय कुटुंबे ही भग्न अवस्थेच्या दिशेने वाटचाल करताना दिसत आहेत. या कौटुंबिक कलहाना वेळीच आवर घालणे काळाची गरज होऊन बसले आहे.

**पराकोटीची स्वार्थी, अहंकारी वृत्ती:**

समाज माध्यमांचा दुष्प्रभाव, समाजात वाढलेली पराकोटीची स्वार्थी, अहंकारी वृत्ती या सर्वांच्या परिणाम स्वरूप कौटुंबिक जीवनातही माणसे पराकोटीच्या स्वार्थी भावनेने वागत आहेत. त्यांच्यातील अहंकार, स्वतःकडे समजूतदारपणाची लीनतेची भावना घ्यायला तयार नाही. त्यामुळे आज प्रचंड प्रमाणात स्वार्थी व अहंकारी वृत्तीत वाढ झालेली दिसून येते.

**एकाकीपणा व नैराश्यात वाढ :**

कौटुंबिक स्तरावरील विविध समस्या, आव्हानांमुळे आज माणसे अंतर्यामी एकाकी स्तरावर जीवन जगत आहेत. आपली सुख दुःखे, आपल्या भावभावना, आपल्या समस्या इतरांशी शेअर करायला त्यांना अवकाशच मिळेना झाला आहे. झाला तरी त्यात आपलेपणा, जिव्हाळा नसतो. परिणामी या सर्व यांत्रिक नातेसंबंधांमध्ये माणसे दिवसेंदिवस एकाकी व एकलकोंडी वृत्तीची झाली आहेत. सगळे काही असूनही नसल्यासारख्या अवस्थेमुळे माणसांच्या आयुष्यात नैराश्यात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे मानसिक आजारांचे प्रमाणही आपल्याला दिवसेंदिवस वाढताना दिसून येत आहे.

**वाढते ताणतणाव, आत्महत्या :**

वरील सर्व समस्या व आव्हानांच्या स्वरूप आज ताणतणाव हा परवलीचा शब्द झाला आहे. ज्याला ताण-तणाव नाहीत असा माणूस मिळवा आणि बक्षीस मिळवा अशा स्वरूपाची जाहिरात देण्याची वेळ येण्या इतपत परिस्थिती गंभीर झाली आहे. लहानापासून ते वृद्धावस्थेपर्यंत प्रत्येक व्यक्ती आज कुठल्या ना कुठल्या ताण-तणावाला सामोरे जाताना दिसत आहे. या परिणाम स्वरूप वेगवेगळ्या ताण-तणावांच्या आहारी जाऊन माणसे आपले मानसिक, भावनिक स्वास्थ्य हरवून बसली आहेत. परिणामी नैराश्याच्या विळख्यात अडकून आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाणही दिवसेंदिवस अधिकाधिक प्रमाणात वाढताना दिसत आहे, विशेष काळजीची बाब म्हणजे यात तरुणांचे, विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षणीय स्वरूपात आढळून आले आहे

**सामाजिक स्तरावरील समस्या व आव्हाने :**

वैयक्तिक स्तर स्तरावर माणूस आज जसा वेगवेगळ्या समस्या व आव्हानांना सामोरा जात आहे तसाच तो वेगवेगळ्या सामाजिक स्तरावरील समस्या व आव्हानांच्या विळख्यात देखील अडकलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील सामाजिक समस्या व आव्हाने यांचा समावेश होतो.

**लोकशाहीची विटंबना:**

भारत हे लोकशाही प्रधान राष्ट्र मानले जाते. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश म्हणून भारताचा लौकिक आहे. परंतु ग्रामपंचायत पासून ते लोकसभेपर्यंत होणाऱ्या वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये

लोकशाहीतील नैतिकतेची आपण आज वेगवेगळ्या पद्धतीने विटंबना होताना पाहत आहोत. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांचे प्रमाण लक्षणीय आहे. निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर विरोधी पक्षाच्या उमेदवारांना पळविणे, त्यांना वेगवेगळ्या प्रकारची आमिषे दाखवणे, अख्खा पक्षच घेऊन इतर पक्षांमध्ये सामील होणे, पक्षादेश न पाळणे, लोककल्याणाच्या कामात भ्रष्टाचार करणे अशा वेगवेगळ्या रूपामध्ये आज आपण लोकशाहीचे विद्रूपीकरण होताना पाहत आहोत. यातील गंभीर बाब म्हणजे भारतातील प्रमुख पक्षातील शीर्षस्थ नेते याबाबतीत काहीच बोलत नाहीत, उलट तेच अशा चुकीच्या प्रथा परंपरांना प्रोत्साहन देत आहेत.

**भ्रष्टाचार :**

लोकशाहीच्या विद्रूपिकरणासोबतच भारतीय समाज व्यवस्थेला भ्रष्टाचाराचा शाप लागलेला आहे. त्यामुळे आज गल्ली ते दिल्ली विविध स्वरूपात आपल्याला राजरोसपणे वेगवेगळ्या रूपात भ्रष्टाचाराची प्रकरणे पाहायला मिळतात. सामान्य माणसाने कष्ट करून प्रामाणिकपणे मिळवलेला पैसा भ्रष्टाचार करणारे कोट्यावधीच्या रूपात सहज हडप करताना दिसतात. यामध्ये सामान्य माणूस दिवसेंदिवस भरडला जात आहे.

**दारिद्र्य, बेरोजगारी, बेकारी :**

राजकारणामध्ये प्रामाणिक, दूरदर्शी, लोककल्याणकारी नेतृत्वाचा अभाव जाणवत आहे. त्यामुळे लोककल्याणाच्या योजना, धोरणे ही केवळ कागदावरच मांडलेली दिसून येतात. भारतीय माणसासाठी नोकरीच्या, रोजगाराच्या संधी दिवसेंदिवस वेगवेगळ्या कारणांनी हिरावून घेतल्या जात आहेत. हाताला काम नाही, डोक्याला विचार नाही, शासनाला लोककल्याणाचे धोरण नाही अशा सर्व स्तरीय विळख्यामुळे आज भारतात दारिद्र्य, बेरोजगारी व बेकारीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढत आहे. वेगवेगळे अहवाल याची साक्ष द्यायला पुरेसे आहेत.

**जातीयवाद, धर्मांधता :**

राजकारणात जात, धर्म हा निवडून येण्याचा प्रमुख निकष मानला जातो. सत्ताधारी शासन हाच दृष्टिकोन केंद्रस्थानी ठेवून जातीयतेला, कट्टर धार्मिकतेला प्रोत्साहन देत आहे. जातीच्या, धर्माच्या झुंडीच्या झुडी तयार होत आहेत. त्यातून इतर जातीतील, धर्मातील लोकांचा द्वेष करण्याचे प्रमाण वाढत आहे. या वाढत्या जातीयवादामुळे, धर्मांधतेमुळे वेगवेगळ्या जाती, धर्मातील दंगलीचे प्रमाण वाढत आहे. राज्य व राष्ट्रीय पातळीवरील निवडणुकांच्या वेळा तर अशा जातीवादाला, धर्मांधतेला आपल्याकडे प्रचंड आक्रमक रूप येताना दिसत आहे.

**पर्यावरणीय ऱ्हास:**

विकासाच्या नावाखाली पर्यावरणीय हिताचा कसलाही विचार न करता मोठमोठे प्रकल्प राबवले जात आहेत. आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण यांच्या नावाखाली नैसर्गिक व्यवस्थेचा समतोल बिघडवला जात आहे. त्यामुळे जल, जमीन, जंगल, आकाश अशा वेगवेगळ्या नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास होतो आहे. परिणामी आज सर्व प्रकारच्या प्रदूषणामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे माणसाचे दैनंदिन जगणेही अवघड होऊन बसले आहे. पुढील काही काळात ऑक्सिजनही विकत घ्यावा लागतो की काय अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे.

**राजकीय संस्कृतीचे विद्रूपीकरण :**

पूर्वी भारतीय राजकारणातील नेते त्यांच्या सुसंस्कृततेबद्दल ओळखले जात. ती त्यांची ओळख असायची. दुर्दैवाने आज मात्र असे सुसंस्कृत राजकारणी नेते अपवादानेच पाहायला मिळतात. त्यामुळे राजकीय संस्कृतीचा कसलाही विधीनिषेध न बाळगता सत्ताधारी पक्षात प्रवेश करणे, विरोधी पक्षाचे उमेदवार पळवणे,

विरोधी पक्षाच्या सदस्यावर सक्तवसुली संचालनालय, इन्कम टॅक्स, एसआयटी वगैरे सारख्या चौकशी फेऱ्यात अडकवणे, निवडणुकीच्या निकालात फेरबदल घडवणे ,प्रतिस्पर्धी उमेदवाराला धमकावणे, खून, गुन्हेगारी खटले दाखल करणे अशा वेगवेगळ्या पद्धतीने आज राजकीय संस्कृतीचे विद्रूपीकरण होताना दिसत आहे.

**समारोप :**

सारांशाने, आज भारतीय समाज कौटुंबिक व सामाजिक स्तरावर वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या व आव्हानांना सामोरे जाताना दिसत आहे. या समस्या व आव्हाने दिवसेंदिवस अधिक गंभीर स्वरूप धारण करताना दिसत आहेत. यातील धोके सामाजिक विचारवंत, कार्यकर्ते तसेच शासनातील धुरीनांनी वेळीच लक्षात घेणे गरजेचे आहे. या सर्वांच्या निराकारणार्थ वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, शासकीय अशा सर्व स्तरातून भरीव अशा स्वरूपाचे प्रयत्न होणे गरजेचे आहे. आपण सर्वजण मिळून या कमी प्रामाणिक प्रयत्न करू शकलो तरच आपण या वाढत्या समस्या व आव्हानांना यशस्वीपणे सामोरे जाऊ शकू. त्यासाठी आपल्यातील शिक्षण. समाज. संस्कृती. राजकारण. विज्ञान, लोकशाही अशा सर्वच व्यवस्थांमध्ये मूलभूत स्वरूपाचे बदल, सुधारणा करण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१. कुंडले, म.बा., शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे : श्री विद्या प्रकाशन
२. दुनाखे, अरविंद, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, कोल्हापूर : फडके प्रकाशन
३. कायंदे पाटील, गंगाधर, भारतीय शिक्षण: इतिहास आणि समस्या, नाशिक : चैतन्य पब्लिकेशन्स
४. करंदीकर, सुरेश ,मंगरूळकर, मीना, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, कोल्हापूर : फडके प्रकाशन
५. करंदीकर सुरेश, शिक्षण आणि भारतीय समाज, कोल्हापूर : फडके प्रकाशन
६. कोंडेकर, ए. वाय., भारतीय समाजाचा परिचय, कोल्हापूर : फडके प्रकाशन
७. कोंडेकर, ए. वाय. भारतीय सामाजिक समस्या, कोल्हापूर: फडके प्रकाशन
८. कोंडेकर, ए. वाय. भारतातील आजच्या सामाजिक समस्या, कोल्हापूर: फडके प्रकाशन